| | |
|---|---|
| MHKO140002932024 | **नियमित दिवाणी दावा क्र.७९/२०२४ मधील निशाणी क्र.१९ वरील आदेश.**<br>**नारायण कृष्णा परीट वि. रामु गुंडु पाटील** |

**( निशाणी क्र.१९ खालील आदेश )**

**दिनांक ०५.०९.२०२४**

**1.** प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहीता १९०८, चे आदेश २६ नियम ९ अन्वये वाद मिळकतीची मोजणी होवून निरीक्षण अहवाल सादर करण्यासाठी न्यायालयीन आयुक्त नेमणेसाठी केलेला आहे.

**2.** वादीचे थोडक्यात कथन असे की, त्यांनी प्रस्तुत दावा कायम मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे. नि.क्र.१२ खालीलआदेशाप्रमाणे वादी यांच्या हक्कात एकतर्फा मनाई आदेश पारित झालेला आहे. तरीही प्रतिवादी यांनी सदर आदेशाचा भंग करुन बांधकाम चालु ठेवले आहे आणि बांधकाम पुर्ण करण्याच्या तयारीमध्ये आहे. त्यामुळेत्याबाबतची वस्तुःस्थीती न्यायालयासमोर येण्यासाठी न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक होणे आवश्यक आहे. अर्ज मंजुर झाल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट सत्य परिस्थीती अभिलेखावर येणार आहे. करिता, मौजे. तांबुळवाडी, ता. चंदगड येथील जुना सर्वे नं.२७/६, चालु गट नं.१२८ चे मोजमाप, बांधकाम आणि स्वरुप इ. बाबत स्थळ निरीक्षण करणेकामी न्यायालयीन आयुक्त यांची नेमनुक होणे आवश्यक आहे. करिता प्रस्तुत अर्ज.

**3.** प्रतिवादी यांनी नि.क्र.२४ खाली लेखी म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध

दर्शविला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, अर्जातील मजकुर खोटा असुन अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. वादातील बांधकाम हे पुर्ण झाले असुन प्रतिवादी हे त्यांच्या कुंटूंबासह राहण्यास आहे. प्रतिवादी यांना त्रास देण्याच्या उद्देशाने प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. अर्ज सादर करण्यास कोणतेही कारण घडलेले नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे.

**4.** अभिलेखाचे अवलोकन केले. वादी तर्फे सुविद्य विधिज्ञ श्री ऐ. एस. कांबळे आणि प्रतिवादी तर्फे सुविद्य विधिज्ञ श्री आर. बी. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसह खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | दावा गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी वादी आणि प्रतिवादी यांच्या मिळकतीची स्थळ निरीक्षण होण्यासाठी न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक होणे आवश्यक आहे काय? | **होय** |
| २ | वादी मागणीप्रमाणे अनुतोष मिळण्यास पात्र आहे काय? | **होय** |
| ३ | काय आदेश? | **अंतिम आदेशांप्रमाणे** |

## कारणमीमांसा

**वाद प्रश्न क्र.१ व २ साठी :-**

**5.** वादीचे सुविद्य विधिज्ञ यांनी असा युक्तिवाद केला आहे की, वादी आणि प्रतिवादी यांचे मिळकतीची स्थळ निरीक्षण होवून बांधकामाबाबत अहवाल सादर झाल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यांनी पुढे असा युक्तीवाद केला आहे की, प्रतिवादी यांनी बांधकाम केले आहे किंवा नाही ही बाब अभिलेखावर

आणण्यासाठी न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक होणे आवश्यक आहे. याउलट प्रतिवादीचे सुविद्य विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला आहे की, न्यायालयीन आयुक्त यांच्यामार्फत वादीस पुरावा गोळा करता येणार नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे.

**6.** दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे **आदेश २६ नियम ९** मध्ये स्थानिक अन्वेषनांकरिता (for local inspection) न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूक करण्याची प्रक्रिया नमूद केलेली आहे. ***नियम ९*** *मध्ये अशी तरतूद आहे की, ज्या दाव्यामध्ये वादग्रस्त बाबीवर अधिक प्रकाश पाडण्यासाठी स्थानिक अन्वेषण आवश्यक अथवा उचित आहे असे न्यायालयास वाटेल त्या दाव्यात, न्यायालयास, त्यास योग्य वाटेल अशा व्यक्तीला असे अन्वेषण करण्याचा व त्यावरील प्रतिवृत्त न्यायालयास कळवणारे आदेश देणारे आयोगपत्र काढता येईल.*

**7.** वरील तरतुदीनुसार, प्रस्तुत अर्ज निकाली काढतांना, हे पाहणे आवश्यक आहे की, स्थानिक अन्वेषनांकरिता (for local inspection) न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूक करणे आवश्यक आहे काय? प्रस्तुत दावा वादी यांनी हक्कज्ञापन व कायम स्वरूपी मनाई हुकुम मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीचे दावेचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांचे मते प्रतिवादी यांनी न्यायालयाचा आदेश असताना देखील बेकायदेशीर आणि अनाधिकारपणे बांधकाम सुरु केलेले आहे. त्यामुळे या प्रकरणात वाद पत्रामध्ये नमुद केलेप्रमाणे दावा मिळकतीमध्ये बांधकाम झाले आहे किंवा नाही, झाले असल्यास सध्याची परिस्थीती काय आहे इ. बाबत स्थळ निरीक्षण

होणे आवश्यक आहे.

**8.** प्रस्तुत दावा जरी स्वरूपी मनाई हुकुम मिळणेसाठी दाखल केलेला असता तरीही, दोन्ही पक्षांचे वाद कथनाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की त्यांच्यामध्ये बांधकाम झाले आहे किंवा नाही याबाबतचा वाद आहे. सदर वादाबाबत आणि तात्पुरता मनाई आदेश पारित करण्यासाठी वाद मिळकतीची सध्याची परिस्थीती विचारात घेणे आवश्यक आहे. त्याकामी स्थळ निरीक्षण अहवाल महत्वाचा ठरणार आहे. तसेच स्थळ निरीक्षणाचे स्वरुप पाहता संबंधीत क्षेत्रातील तज्ञ यांची नेमणुक करण्याची आवश्यक्ता नाही. त्याकामी विधिज्ञ यांची नेमणुक करणे योग्य राहिल, दाव्याचे स्वरुप पाहता या प्रकरणात न्यायालयीन आयुक्ताचा अहवाल महत्वाचा ठरणार आहे. जागेवरील वस्तुस्थिती न्यायालयासमोर येण्यासाठी न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करणे आवश्यक आहे. भविष्यातील गुंतागुंत व उशीर टाळण्यासाठी, या दाव्यामधे न्यायालयीन आयुक्त नेमणे आवश्यक आहे. अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होणार नाही, उलट दावा गुणवत्तेवर निकाली निघण्यास मदत होणार आहे.

**9.** उपरोक्त चर्चेनुसार, मी **मुद्दा क्र. १ आणि २ यांचे निष्कर्ष होकारार्थी नोंदवीत** आहे आणि मुद्दा क्र.३ चे उत्तरासाठी खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अॅडव्होकेट श्री.जी. एन. दळवी यांची या प्रकरणात वादमिळकत म्हणजे मौजे. तांबुळवाडी, ता. चंदगड येथील सर्वे नं.२७/६ब, चालु गट नं.१२८ क्षेत्र

०.हे.१४आर. मधील मिळकतीचे स्थळ निरीक्षण होवून कथीत बांधकामाचे मोजमाप,सध्यस्थिती पाहणेकरिता न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करण्यात येते.

३. न्यायालयीन आयुक्त यांनी वर नमूद मिळकतीमधील बांधकामाबाबत स्थळ निरीक्षण करुन त्याबाबतचा अहवाल १५ दिवसाच्या आत सादर करावा.

४. न्यायालयीन आयुक्त यांनी दोन्ही पक्षांना व इतर संबंधीतांना स्थळ निरीक्षण तारीख, वेळ बाबत नोटीस द्यावी आणि स्थळ निरीक्षण कामी त्यांना हजर राहण्याचे निर्देश द्यावे.

५. न्यायालयीन आयुक्त यांना पत्र पाठवण्यात यावे तसेच सोबत या आदेशाची प्रत माहीतीस्तव पाठवावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by WAMAN DIGAMBAR JADHAV
Date: 2024.09.05 17:30:28 +0530

दिनांक– ०५/०९/२०२४ (वामन दि. जाधव)
ठिकाण–चंदगड सह दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर,
चंदगड (संकेतांक एमएच–०३१४३)